## समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, बीड.

### कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील रिक्त पदांचा आरक्षण तक्ता

| अ.क्र. | पदाचे नाव | भरावयाची एकूण पदे | अनु.जाती. | अनु.जमाती | खुला |
|---|---|---|---|---|---|
| 1 | गृहप्रमुख | 2 | 1 | 0 | 1 |
| 2 | लेखापाल | 2 | 1 | 0 | 1 |
| 3 | चौकीदार | 2 | 1 | 0 | 1 |
| 4 | शिपाई | 1 | 0 | 0 | 1 |
| 5 | सहाय्यक स्वयंपाकी | 2 | 0 | 1 | 1 |
| एकूण | | **9** | **3** | **1** | **5** |

### उपरोक्त दर्शविलेली पदे खालील बाबींच्या अधिन राहून भरण्यात येतील:-

1) अ.क्र. 1,2,4,5 ही पदे महिला उमेदवारांमधून भरण्यात येतील.
2) जाहीरातीत नमुद सर्व पदांसाठी उमेदवाराचे वय दिनांक 1/1/2019 या दिनांकास 18 वर्षापेक्षा कमी नसावे तसेच कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी 38 वर्षे व मागासवर्गीय उमेदवारांसाठी 43 वर्षापेक्षा जास्त नसावे.
3) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.
4) उमेदवाराने दिलेल्या विहीत नमुन्यात सर्व सादर करावा. अर्जावर विहित ठिकाणी अलीकडच्या काळातील एक पासपोर्ट साईजचा फोटो लावावा. व त्यावर स्वतः स्वाक्षरी करावी. अर्ज A4 साईज कागदावर संगणकीकृत केलेला असावा.
5) एका पेक्षा जास्त पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास उमेदवाराने प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावालागेल.
6) राखीव प्रवर्गासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवाराने अर्जासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे. (सत्यप्रत)
7) आवेदन पत्रासोबत खुल्या प्रवर्गातील उमेदवाराने रु. 400/- चा व मागासवर्गीय उमेदवारांनी रुपये 200/- चा धनाकर्ष अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. धनाकर्ष SSA KGBV DISTRICT Beed या नावे व राष्ट्रीयकृत बँकेचा असावा.
8) अनुभव प्रमाणपत्राच्या सत्यप्रतीवर राजपत्रीत अधिकाऱ्यांची दिनांकीत प्रति स्वाक्षरी असावी. अनुभव हा शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता उत्तीर्ण झाल्यानंतरचा असावा. पूर्वीचा अनुभव ग्राह्य धरला जाणार नाही.
9) उमेदवाराने आवेदनपत्रा सोबत शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या साक्षांकित सत्यप्रती जोडाव्यात.

### कंत्राटी पद्धतीने शिक्षकेत्तर कर्मचारी पदभरती जाहीरात.

समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, बीड अंतर्गत कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय गेवराई व वडवणी येथील रिक्त पदे मा. राज्य प्रकल्प संचालक, म.प्रा.शि.प. मुंबई यांचे पत्र जाक्र/2860 दिनांक 5/11/2018 अन्वये खालील विवरणानुसार संपूर्णतः तात्पुरत्या स्वरुपाची असून ती कंत्राटी (करार) पद्धतीने एकत्रित परिश्रमिकावर भरावयाची आहेत.

सरळसेवा भरतीसाठी विहित शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. उच्छुक उमेदवारांनी आपले अर्ज दिनांक / /2018 पर्यंत कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता शिक्षणाधिकारी (प्रा.) सर्व शिक्षा अभियान, कार्यालय, पंचायत समिती परिसर नगर रोड,बीड या पत्त्यावर प्रत्यक्ष अथवा पोष्टाने सादर करावेत. विलंबाने आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

Scanned by CamScanner

| अ.क्र. | पदाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक, व्यावसायिक पात्रता व अनुभव | मासीक परिश्रमिक |
|---|---|---|---|---|
| 1 | गृहप्रमुख (फक्त महिला) | 2 | कोणत्याही शाखेची पदवी+BSW किंवा MSW+MSCIT व दोन वर्षाचा गृहप्रमुख म्हणून अनुभव असल्यास प्राधान्य | रु. 25000/- |
| 2 | लेखापाल (फक्त महिला) | 2 | कोणत्याही शाखेचा पदविधर+MSCIT+Typing मराठी 30 शब्द प्रति मिनिट इंग्रजी 40 शब्द प्रति मिनिट (बी.कॉम व लेखाविषयक कामाचा किमान एक वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य | रु. 15000/- |
| 3 | चौकीदार (पुरुष) | 2 | सेवा दलातून निवृत्त झालेले माजी सैनिक पोलीस दलातून निवृत्त झालेले माजी पोलीस ते उपलब्ध नसल्यास सुरक्षा विषयक प्रशिक्षण झालेल्या व्यक्ती | रु. 9000/- |
| 4 | शिपाई (फक्त महिला) | 1 | किमान सातवी पास | 9000/- |
| 5 | सहाय्यक स्वयंपाकी (फक्त महिला) | 2 | किमान साक्षर | रु. 9000/- |

**(चौकीदार वगळता इतर सर्व पदे महिला उमेदवारांसाठी राखीव आहेत. )**

10) सदरची पदे कंत्राटी व तात्पुरत्या स्वरुपाची असून निवड झालेल्या उमेदवारांना कंत्राटी पद्धतीने सहा महिने कालावधीसाठी नियुक्ती आदेश देण्यात येतील. सदरची पदे ही कधीही कायम होणारी नाहीत. सदर पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर कायम करण्यासाठी कोणत्याही दावा उमेदवारास करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

11) अपूर्ण माहिती भरलेले विहित नमुन्यात नसलेले व आवश्यक कागदपत्रे सोबत न जोडलेले अर्ज नाकारण्यात येतील.

12) पोष्टाने झालेल्या विलंबासाठी हे कार्यालय जबाबदार राहणार नाही व त्याबाबत कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

13) सामाजिक, समांतर आरक्षणात बदल करण्याचे सर्व अधिकार खालील निम्न स्वाक्षरीकार यांनी राखून ठेवले आहेत.

## निवड पद्धत

1) उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इ. 12 वी ) दर्जाची मराठी, इंग्रजी, सामान्यज्ञान, व बौद्धीक चाचणी या विषयाची 100 गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.
2) आवश्यकता भासल्यास लेखापाल या पदाची टायपिंग परीक्षा घेण्यात येईल.
3) महिला उमेदवारांना खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती (गट/क्रिमिलेअर) यामध्ये मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे कागदपत्र तपासणीचे दिनांकास वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करावे लागेल.
4) लहान कुटुंब असल्याचे विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. (अविवाहीत उमेदवारांनी अर्जामध्ये लागू नाही असे नमुद करावे.)
5) मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सादर करण्याच्या अटीवर मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती दिली जाईल.

Scanned by CamScanner

सहा महिन्याच्या आत जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

6) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती किंवा कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास किंवा त्याचे पूर्व चरित्र बरोबर नसल्याचे आढळल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी /नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल व त्यानंतर त्याबाबत उमेदवाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

7) या जाहीरातीतील नमुद पदावर उमेदवाराची निवड न्यायालयातील निर्णय,शासनाच्या विविध विभागाचे शासन निर्णय व परिपत्रके यातील निर्देशाच्या अधिन असेल.

8) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

9) निवडी बाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय तथा जिल्हाधिकारी, बीड यांनी राखून ठेवले आहे.

**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जि.प. बीड

**उपाध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
मुख्य कार्यकारी अधिकारी
जि.प. बीड.

**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
जिल्हाधिकारी, बीड.

Scanned by CamScanner

# समग्र शिक्षा, जिल्हा परिषद, बीड.
## कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातील पदासाठी आवेदनपत्राचा नमुना

अर्जाचा आवक क्र. [ ] अर्ज केलेल्या जातीचा प्रवर्ग [ ]

प्रति,

**सदस्य, सचिव,**
**जिल्हा निवड समिती तथा**
शिक्षणाधिकारी (प्रा.)
जिल्हा परिषद, बीड.

उमेदवाराचे
अलिकडच्या
काळातील
पासपोर्ट फोटो

**विषय- ---------------------------------- पदा करीता विनंती अर्ज.**

1. उमेदवाराचे संपूर्ण नाव:- --------------------------------------------------------------------------------
2. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- ---------------------------------------------------------------------------

   दूरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र. ------------------------------------------------------------------------
3. कायमचा संपूर्ण पत्ता :- -------------------------------------------------------------------------------

   दूरध्वनी क्रमांक व मोबाईल क्र.
4. जन्म दिनांक (अंकात) --------------------- अक्षरी ----------------------------------------------------
5. दिनांक 01/01/2019 रोजीचे वय ----------- वर्ष----------- महिने------------- दिवस ----------------
6. जातीचे नाव -------------------------- जातीचा प्रवर्ग------------------------- लिंग------------------

   (SC-1,ST-2, VJNT-3, NT(B)-4, NT (C)-5, NT(D)-6, OBC-7, SEBC-8, OPEN-9)
7. शैक्षणिक / व्यावसायिक अर्हता (तांत्रीक शिक्षणासह)

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | बोर्ड/विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष/महिना | एकूण गूण | मिळालेले गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

Scanned by CamScanner

8. <u>अनुभवाचा तपशिल :-</u>

| अ.क्र. | कार्यालयाचे नाव/संस्थेचे नाव | पदाचे नाव | सेवा कालावधी | | एकूण सेवा | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | पासून | पर्यंत | वर्ष | महिना | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

9. अर्जदार महाराष्ट्राचा रहिवाशी आहे काय? होय / नाही.

10. अर्जदार माजी सैनिक आहे काय? होय / नाही.

11. राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष :- धनाकर्ष क्रमांक ------------------- रक्कम रुपये -----------------

(खुला प्रवर्ग 400/- रु मागास प्रवर्ग 200/- रु.) बँकेचे नाव :- ------------------------- दिनांक ------------------

वर नमुद केलेली माहिती खरी व बरोबर आहे या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता,वयोमर्यादा मी धारण करीत आहे. याची खात्री करुनच मी हा अर्ज करीत आहे. मी आणखी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास या माहितीच्या आधारे मला मिळालेली नौकरी गमावण्यास मी पात्र राहील. तसेच माझ्या विरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-------------------------

दिनांक :- -----------------------

**(उमेदवाराचे संपूर्ण नाव व स्वाक्षरी)**

**<u>सोबत जोडलेली कागदपत्राची यादी :-</u>**

1.------------------------------------------ 2. .------------------------------------------

3. .------------------------------------------ 4. .------------------------------------------

5. .------------------------------------------ 6. .------------------------------------------

7. .------------------------------------------ 8. .------------------------------------------

9. .------------------------------------------ 10. .------------------------------------------

Scanned by CamScanner